आनंद नगरी दि. 31/05/2025

# लातूर फाट्याजवळ खंजर बाळगणाऱ्या दोघांवर कारवाई



नांदेड (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाण्याअंतर्गत संशयास्पदरित्या वावरणाऱ्या दोघांना पकडून पोलिसांनी त्यांच्याकडून खंजर व मोटारसायकल असा एकूण ४० हजार ५०० रुपयाचा ऐवज ताब्यात घेतला आहे. दि.२९ मे रोजी सायंकाळी लातूर फाट्याजवळ ही कारवाई करण्यात आली. ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत विनापरवाना व बेकायदेशिररित्या शस्त्र बाळगणाऱ्या दोघांवर गुन्हे शोध पथकाने कारवाई केली आहे.

लातूर फाट्याजवळ दमाम यांच्या दुकानासमोर दोन युवक संशयास्पदरित्यावावरत असल्याचे गुन्हे शोध पथकाला निदर्शनास आले. मोटारसायकलवर जाणारे सुखविंदरसिंग मेजरसिंग राय (वय २५), रा.गुरुद्वारा गेट नं.५ व प्रितमसिंग दिलीपसिंग काम ठेकर (वय ), रा. कामठा गणपूर ह.मु. खालसा हॉटेलजवळ या दोघांना अडवले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे लोखंडी खंजर आढळून आले. ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलीकर यांच्या मार्गदर्शनाखालील गुन्हे शोध पथकातील पोउपनि बाबुराव चव्हाण, पाहेकॉ रामकिशन मोरे, प्रमोद कऱ्हाळे व संघरत्न गायकवाड यांच्या पथकाने ही कारवाई केली.